**रे.दि.मु. ५५/२०१५**

## <u>निशाणी क्र. ६१ वरील आदेश</u>

वादी तर्फे सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ही मयत झाल्याने तिचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ डॉ. राजेंद्र संभाजी सोनुने हे दिनांक ०३/०७/२०२० रोजी मयत झाले आहे व मृत्युचा उतारा नि.क्र. ६३ लगत दाखल केलेला आहे. मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. वादी हे वयोवृध्द असल्याने व कोरोना कालावधीमुळे मयत प्रतिवादीचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यास विलंब झाला. मयताचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी वादीला उशिर झालेला असून सदर विलंब अर्जात नमूद कारणास्तव माफ करणेत यावा यासाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जावर मयताच्या वारसांचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादीने अर्जात झालेल्या उशीराबाबत कोणतेही संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. वादीने सदरचा अर्ज केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतूने दाखल केलेला आहे. वादीला प्रतिवादीच्या मृत्युबाबतची पुर्णपणे माहिती होती. सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा, हा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचा ताबा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ चे वारस मुदतीत घेण्यासाठी वादीला विलंब झालेला आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषांवर होण्याकरिता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्याकरिता झालेला विलंब हा वादीवर खर्च लादून माफ करणे योग्य होईल. करीता, वादीने मागणी केल्याप्रमोण अर्ज मंजूर करणे योग्य होईल.सबब, खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नि. ६१ विलंब माफी होवुन वादीवर खर्च रुपये २००/– लादून मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरचा खर्च प्रतिवादी यांना द्यावा.

Digitally signed by PRUTHAVI SANJAY PATIL
Date: 2022.01.05 17:22:15 +0530

उमरखेड (पी.एस. पाटील)

दिनांक–०५/०१/२०२३ दिवाणी न्यायाधी क. स्तर, उमरखेड

**रे.दि.मु.** ५५/**२०१५**

प्रमाणपत्र

यावदारे मी असे प्रतिपादन करतो की, वरील आदेश व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकुर मूळ आदेशाशी तंतोतंत बरोबर आहे.

| | |
|---|---|
| आदेशाचा दिनांकः | ०५/०१/२०२३ |
| आदेश स्वाक्षांकित दिनांकः | ०५/०१/२०२३ |
| लघुलेखकाचे नावः | य.वि.पोरकुटे |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांकः | ०६/०१/२०२३ |